# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. १४८/२०१८**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ अन्वये निर्धारित केलेली माहिती प्रकट करणेबाबत राज्य शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचना दिलेल्या आहेत, तथापी मे. राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिलांचा ओग वाढत असून अपिलांची प्रलंबितता वाढत आहे, त्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठया प्रमाणात ज्या बाबींची माहिती, माहिती अधिकारांतर्गत मागितली जाते त्या बाबींची माहिती सार्वजनिक प्राधिकरणांने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द केल्यास माहिती अधिकार अर्जांचे प्रमाणे कमी होईल. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदाराचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्यास व आपल्या आदेशाची पुर्तता करण्याबाबत आढावा घेतल्यास मे. राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या व्दितीय अपिलांची संख्या कमी होण्यास मदत होईल. त्याकरिता माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक परिणामकारकरित्या करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र.६६/सहा, दिनांक १३/०४/२०१८ अन्वये वरीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पृष्ठांकन क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.६०/२०१८/आस्था-२, दिनांक ०८/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये देखील कळविले आहे. सदर सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक यासोबत जोडण्यात आले आहे.

तरी सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रकान्वये दिलेले निर्देश विचारात घेऊन संबंधितानी त्यानुसार कार्यवाही करावी.

२३/८/१८

**(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०१८/१६५४**
**दिनांक -२४/८/२०१८.**

**<u>सोबत :-</u>** वरीलप्रमाणे शासन परिपत्रक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
३) सर्व प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

e. No- 30487125/2018

9/5

2 MAY 2018
...
आवक क्र. ...
दिनांक ... २१५/०५/१८
...

माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी सर्व सार्वजनिक प्राधीकरणांकडून होणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.६६/सहा,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १३ एप्रिल, २०१८

पहा:- (१) शासन परिपत्रक क्र.केमाअ २०१३/१५६/प्र.क्र.३६० /सहा, दि.०९.०५.२०१४
(२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.(२४०/१४) सहा, दि.१३.०२.२०१५
(३) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/ प्र.क्र.(४७/१५) /सहा, दि.०५.०५.२०१५

परिपत्रक:-

सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत:हून किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम, याच्या कलम ४(१)(ख) अन्वये निर्धारित केलेली माहिती प्रकट करणे अपेक्षित आहे. कलम ४(२) व कलम ४(३) मध्ये या माहितीचा प्रसार करण्याची पध्दत विहित केली आहे. सार्वजनिक प्राधिकरणांची कार्ययंत्रणा अधिक पारदर्शक बनविण्याकरिता तसेच माहितीच्या अधिकारात व्यक्तिगत अर्ज करण्याची गरज कमी होण्याकरिता, सकारात्मक तत्वावर सार्वजनिक क्षेत्रातील माहिती जनतेला मोठ्या प्रमाणात मिळण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी कलम ४ अन्वये, स्वत:हून माहिती प्रकट करावयाची आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलांचा ओघ वाढत असून अपीलांची प्रलंबितताही वाढत आहे. त्याकरीता माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक परिणामकारकरित्या होणे आवश्यक आहे. सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात ज्या बाबींची माहिती, माहिती अधिकारांतर्गत मागितली जाते त्या बाबींची माहिती सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने प्रसिध्द केल्यास माहिती अधिकार अर्जाचे प्रमाण कमी होईल. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अर्जदाराचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्यास व आपल्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत आढावा घ्यावा जेणेकरुन आयोगाकडे होणा-या द्वितीय अपीलांची संख्या कमी होण्यास मदत होईल.

२. उपरोक्त बाबी सर्व विभागांच्या व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/सार्वजनिक प्राधिकरणे यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०४२०१५२१५७०६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shwetambari Pravin Khade

Digitally signed by Shwetambari Pravin Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=General Administration Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=d2e525f024133a519abcf2dbb6bd01281
beb6bf02f01c42818d29c1399ab8446,
cn=Shwetambari Pravin Khade
Date: 2018.04.20 15:23:09 +05'30'

(श्वे.प्र.खडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
३) मा. विरोधी पक्षनेता, (विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन,मुंबई,
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई,
६) महालेखापाल-१/२(लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) महालेखापाल-१/२(लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सर्व माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
९) सचिव राज्य माहिती आयोग,मुंबई.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.
१३) निवडनस्ती कार्यासन सहा.